नि.फौ.ख.क्र.७२ /२०२३
सरकार / बाळकृष्ण
नि.क्र. २९

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी,</u>**

**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | कुसमन सुरेश बोहरे |
| वय | : | ५० वर्षे, कामधंदा : शेती |
| राहणार | : | शिवणटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया |

**<u>सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु</u>**

मी आरोपींना ओळखते. घटना दिनांक २३/०१/२०२३ रोजी व दिनांक २४/०१/२०२३ रोजी घडली होती. दिनांक २३/०१/२०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आमच्या शेतातील पाईप फेकुन दिले होते. त्यानंतर दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास आरोपींनी माझ्या मुलास पावडयाने मारहान केली, त्यावेळी प्रमोद बोहरे व बाळकृष्ण बोहरे यांनी माझ्या मुलाला पकडून ठेवून व विनोद बोहरे याने माझे मुलास पावडयाने डोक्यावर व पायावर मारले. त्यावेळी माझा मुलगा बेहोश पडला, त्यावेळी माझा भाचा राजु राकडे याने मोटर सायकल वर त्याला पोलीस ठाण्यात नेले व तेथून वैद्यकिय उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालयात घेऊन गेले. त्यानंतर पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिली, आता मला तक्रार दाखविण्यात आली, ती तीच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र. ३०** व छापील फिर्यादी **नि.क्र. ३१** देण्यात येतो. आरोपीनी ज्या पावडयाने माझ्या मुलाला मारले ते पावडे मी पाहिल्यावर ओळखू शकते, आता ते पावडे दाखविण्यात आले, ते तेच आहे, त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील बी. एस. पाथोडे यांच्या मार्फत सुरु**

पोलीसांनी माझा बयान घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सोबत आमचे शेताची बांधा वरुन वाद असल्याने आमच्यात दोन चार वर्षा पासून बोलचाल बंद आहे. पोलीसांनी माझे समक्ष पाईप जप्त केले नाही तसेच शिवधुऱ्याचा दगळ देखील जप्त केला नाही. दिनांक २३/०१/२०२३ रोजीचा घटने बाबत मी रिपोर्ट दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर शिवधुऱ्या वरुन आम्ही रिपोर्ट दिल्यापासुन जाणे येणे करतो. आम्ही आमच्या जमीनीची मोजणी केलेली नाही. मी तक्रार देत्यावेळी माझा मुलगा बेशुध्द पडला होता असे पोलीसांना सांगितले होते मात्र माझ्या तक्रारीत तसे का नमुद नाही त्याचे कारण मी सांगु शकत नाही. माझे घरकामे १० वाजेपुर्वी आवरतात. आरोपींनी पाईप तोडले म्हणून भरपाई मिळण्यासाठी आम्ही दिवाणी कार्यवाही केलेली नाही. घटनास्थळावरुन पोलीसांनी माती जप्त केलेली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा शिव धुऱ्याच्या दगळावर पडला व त्याला मार लागला. शिवणटोला ते आमगांव पोलीस स्टेशन हे अर्धा तासाच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमचे कोणतेही पाईप फोडले नव्हते. पाईप आमच्या मालकीचे होते याबाबत मी कोणतेही बील पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रमोद बोहरे व बाळकृष्ण बोहरे यांनी माझ्या मुलाला पकडून ठेवून व विनोद बोहरे याने माझे मुलास पावडयाने डोक्यावर व पायावर मारले हे मी खोटे शांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा बेहोश पडल्याचे मी खोटे शांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते तशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवधुऱ्या आमच्या कब्जात घ्यावयाचे होता म्हणुन आम्ही खोटी फिर्याद दाखल केली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
**स्वा/-**

आमगांव
(एम.व्ही.जावळे)

दिनांक : ०८/११/२०२४
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

नि.फौ.ख.क्र.७२ /२०२३
सरकार / बाळकृष्ण
नि.क्र. ३२

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : चंद्रकुमार हिरालाल राखडे
वय : ३४ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : शिवणटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना, फिर्यादीला व जखमीला ओळखतो. पोलीसांनी मला दिनांक २४/०१/२०२३ रोजी शेतात पंचनाम्यासाठी बोलाविले होते, तेथे पोलीसांनी घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा तयार केला, तो मला वाचून दाखविला, त्यानंतर मी त्यावर सही केली. आता मला तो पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र. ३३** देण्यात येते.

दिनांक २३/०१/२०२३ रोजी इश्वरदास यांनी मला तंटामुक्ती सदस्य असल्याने आरोपीसोबत वादा बाबत फोन करुन तुम्ही शेताकडे असे सांगितले, मात्र मी शेताकडे गेलो नाही. दुसऱ्या दिवशी दिनांक २४/०१/२०२३ रोजी मी फिर्यादीच्या शेताकडे गेलो होतो, तेथे फिर्यादीचा मुलगा ईश्वरदास तेथे होता, प्रमोद बोहरे व तंटामुक्ती सदस्य टेकरामजी हेमने हजर होते. त्यावेळी ईश्वरदास व प्रमोद यांना वादा बाबत विचारणा केली तेव्हा प्रमोद म्हटला की मी मोठया भावाला बोलावतो. त्यावेळी आरोपीचे वडील व प्रमोद यांनी फिर्यादीच्या मुलाला म्हणजे इश्वरदासला धरले तर त्यापैकी लहान विनोद याने पावडयाने इश्वरदासच्या डोक्यावर मारले. त्यावेळी सुनिल बोहरे यांनी भांडण सोडविले.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील बी. एस. पाथोडे यांच्या मार्फत सुरु**

पोलीसांना बयान देते वेळी मी असे सांगितले होते की, प्रमोद म्हणाला मी मोठया भावाला व वडीलाला बोलावून आणतो मात्र तसे माझ्या जवाबत का नमुद नाही त्याचे कारण मी सांगु शकत नाही. कुसमनबाई ही माझी आत्या आहे तर ईश्वरदास बोहर हा माझा आत्येभाऊ आहे. मी आरोपी व फिर्यादीस तंटामुक्ती बाबत नोटीस दिली नव्हती. शेतावर जाण्याबाबत कोणताही ठराव घेतला नव्हता. तंटामुक्तीची मिटींग ग्राम पंचायत हॉल मध्ये भरवतो. सदर हॉल मध्ये आरोपी व फिर्यादीला बोलावून त्यांचे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पावडे सर्वांच्या घरी असते. आम्ही शेतावर जाण्याकरीता कोणताही अधिकाऱ्याची आदेश घेतला नव्हता. पोलीसांना बयान देते वेळी ईश्वरने मला फोन करुन शेतावर या असे

सांगितले होते असे मी बयानात सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीशी माझे नाते संबंध असल्याने मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीच्या मुलाला कोणतीही मारहान केली नाही. माझ्या समक्ष पाईप जप्त केले नाही. पोलीसांनी घटनास्थळ वरुन माती जप्त केलेली नाही. घटनास्थळ पंचनामा दिनांक २४/०१/२०२४ रोजी बनविण्यात आला हे पंचानाम्या नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. घटनास्थळावरील शेतीचा सातबारा उतारा माझ्या समक्ष जप्त केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचानाम्यावर पोलीस ठाण्यावर जाऊन सही केली. राजू महारवाडे यांनी कोठे सही केली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या व फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात मजकुर मी खोटे कथन केले आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
**स्वा/-**
(एम.व्ही.जावळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

आमगांव
दिनांक : ०८/११/२०२४

सरकार / बाळकृष्ण

नि.क्र. ३९

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी,**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : टेकचंद मोडकु हेमने

वय : ५७ वर्षे, कामधंदा : शेती

राहणार : शिवणी, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना, फिर्यादीला व जखमीला ओळखतो. पोलीसांनी मला दिनांक २५/०१/२०२३ रोजी जप्ती पंचनाम्यासाठी पोलीस ठाण्यात आमगांव येथे बोलाविले होते. त्यावेळी पोलीस व इतर लोक हजर होते. साक्षदार पुन्हा सांगतो की, आरोपी बाळकृष्ण बोहरे याच्या घरी पावडा जप्ती साठी बोलाविले होते, त्यावेळी पोलीसांनी आरोपीच्या घरुन पावडे जप्त केले, त्यानंतर आम्ही आमगांव पोलीस ठाण्यात आलो तेव्हा पोलीसांनी सही घेतली होती. आता मला तो जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र. ४०** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. पाथोडे यांच्या मार्फत सुरु**

पोलीसांनी पंचनाम्यासाठी येण्यासाठी लेखी नोटीस दिली नव्हती. पोलीसांनी पावडे कृष्णकुमार बोहरे, प्रमोद बोहरे, विनोद बोहरे यांच्या घरुन जप्त केले होते. ज्या घरातून पावडे जप्त केले त्या घरात मी गेलो नव्हतो, मी बाहेर उभा होतो. असे झाले नव्हते की, पोलीसांनी आंबाच्या झाडा खालून पावडे जप्त केले होते. पोलीसांनी पंचनाम्यात आरोपीच्या घरुन पावडे जप्त केले आहे असे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनाम्यात आरोपीच्या घरासमोरील आंगणात असलेल्या आंबाच्या झाडाखालून पावडा जप्त केल्याचे जप्ती पंचनाम्यात खोटे नमूद केले आहे. पोलीसांनी बाळकृष्ण बोहरे या आरोपीकडून पावडे जप्त केले. हे म्हणणे खरे आहे की, पावडे प्रत्येकाच्या घरी असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतीही जप्त झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत माझे पटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**स्वा/-**

आमगांव (एम.व्ही.जावळे)

दिनांक : १८/०२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

सरकार / बाळकृष्ण

नि.क्र.४१

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ ची जबानी,**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : ईश्वरदास सुरेश बोहरे

वय : ३३ वर्षे, कामधंदा : शेती

राहणार : शिवणी, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना व फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी माझी आई आहे. घटना दिनांक २४/०२/२०२३ रोजी ८.३० ते ९.०० वाजेच्या सुमारास घडली होती. मी २४ तारखेला पाणी वागवण्यासाठी पाईप लावला होता, तो विनोद बोहरे याने फेकुन दिला होता. दुसऱ्या दिवशी पोलीस पाटील, सरपंच व तंटामुक्त अध्यक्ष व गावातील इतर सदस्य यांना बोलावून शिवधुऱ्यावरुन आरोपी विनोद बोंहरे याने पाईप फेकला आहे, असे सांगितले. त्यानंतर आम्ही शेताकडे गेलो. तेथे विनोद बोहरे हजर होता. त्यावेळी त्याला विचारणा केली की का बरे असे करतो तेव्हा तो आपल्या वडीलाला बोलवायला गेला व वडीलांना व मोठया भावाला घेऊन आला. त्यावेळी त्यांनी सदर इतर लोकांना व मला काही विचारपुस न करता विनोद बोहरे याने मला पावडयाने मारायला सुरवात केली व माझ्या दोन्ही पायावर पावडयांनी मारले. प्रमोद बोहरे याने मागेहून पकडून ठेवले व विनोद बोहरे याने माझ्या डोक्यात मारले. त्यावेळी माझ्या डोक्यातून रक्त निघत होते. तरी देखील आरोपी प्रमोद मला सोडत नव्हता व विनोद बोहरे मला मारणे चालुच ठेवले होते. त्यावेळी सुनिल बोहरे आला व त्याने विनोद याच्या हातातून पावडा हिस्कावून घेतला. त्यानंतर मला नेतराम बोहरे व चंद्रकुमार राखडे याने मला घरी नेले. तेथून राजाराम राखडे व राजू राखडे यांनी चंद्रकुमार राखडे याच्या मोटारसायकलने मला पोलीस स्टेशनला नेले. तेथे मी रिपोर्ट दिली. पोलीसांनी मला दवाखान्यात नेले तेथून मला गोंदिया रेफर केले होते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. गुप्ता यांच्या मार्फत सुरु**

मी लेखी रिपोर्ट दिली नव्हती, मी पोलीसांना तोंडी रिपोर्ट दिली होती. मी रिपोर्टवर नंतर सही केली होती. सुनिल बोहरे याने पावडा विनोद बोहरे याच्या कडून घेतल्यानंतर जागेवरच टाकून ठेवले होते. त्यानंतर बाकीचे लोकांनी पावडे उचलले किवा कसे मला माहित नाही. त्यावेळी माझे कपडे गमच्छा रक्ताने भरले होते. पोलीसांनी माझे कपडे व गमच्छा जप्ती केले नाही. मी तंटामुक्ती अध्यक्षांना तोंडी तक्रार केली होती. तंटामुक्ती वालांच्या ते घटनास्थळावर येत असल्याबाबत आरोपींना कळविले नव्हते. आरोपींसोबत घटनेपुर्वी चार ते पाच वर्षापासुन चांगले संबंध नाहीत. पोलीसांनी पाईप जप्त केले नव्हते. तेथे जमलेले लोकांनी आरोपीच्या तावडीतून मला सोडविले नव्हते. मीच दिनांक २४ तारखेला पाणी वागविण्यासाठी पाईप लावला होता तो आरोपीने फेकून दिला होता असे माझ्या बयानात का

नमुद नाही त्याचे कारण मी सांगु शकत नाही. शिव धुऱ्यावरुन आमचा वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शिव धुऱ्या माझा आहे असे म्हणत होतो व आरोपी माझा आहे असे म्हणत होते म्हणुन आमचे वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/०२/२०२३ रोजी घडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी प्रमोद याने मला धरुन ठेवले होते व आरोपी विनोद याने पावडयाने पायावर व डोक्यावर मारले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या डोक्यातून रक्त निघाले होते व कपडे व गमच्छा रक्ताने भरले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सुनिल बोहरे याने आरोपीच्या तावडीतून सोडविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी रिपोर्ट दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कोणतीही मारपीट केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे आरोपीसोबत जुने वाद असल्याने आरोपीला फसविण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द मी माझ्या सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**स्वा/-**

आमगांव — (एम.व्ही.जावळे)

दिनांक : १८/०२/२०२५ — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

सरकार / बाळकृष्ण
नि.क्र.४२

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : नेतराम मोतीराम बोहरे
वय : ४३वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : शिवणीटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना व फिर्यादीला ओळखतो. घटना दिनांक २४/०२/२०२३ रोजी ९.३० ते १० वाजेच्या सुमारास घडली होती. त्यावेळी ईश्वर बोहरे व आरोपीच्या शेतात गेलो होतो. त्यावेळी मी तंटामुक्ती सदस्य होतो. त्यावेळी ईश्वर बोहरे तेथे हजर होता. त्यांनी धुऱ्याच्या भांडणाविषयी सांगितले व समझौता करायचा आहे असे सांगितले. तेथे विनोद बोहरे आलेला होता. त्यावेळी त्याला समझौता बाबत सांगितले असता, बापचीला बोलावे लागेल असे सांगितले. त्यानंतर विनोद बोहरे त्यांच्या वडीलांना बोलवायला गेला व वडीलांना व भाऊ प्रमोद याला घेऊन आला. तेथे कोणतेही बोलणे चालणे झाले नाही व विनोद बोहरे याने भांडण सुरु केले. तेव्हा विनोद बोहरे याच्या हातातील पावडा ईश्वर बोहरे याला लागला. त्यानंतर आम्ही ईश्वर बोहरे याला चंद्रकुमार राखडे याच्या गाडीवर घरा पर्यंत सोडून दिला. त्यानंतर राजाराम राखडे विजू राखडे हे ईश्वरदास याला दवाखान्याकडे घेऊन गेले त्यानंतर आम्ही आपल्या घराकडे घेऊन गेलो.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. गुप्ता यांच्या मार्फत सुरु**

त्यावेळी आठ नऊ लोक आम्ही गेलो होतो. त्यावेळी ईश्वरदासची आई घरी होती. आम्ही मारपीट सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. आरोपीने पावडा डोक्यावर मारला. बाकी ठिकाणी मारलेला मी पाहिलेला नाही. त्यावेळी पावडे सुनिल बोहरे याने हिसकला व तो पावडा ईश्वर बोहरे याच्या घरी घेऊन गेला. आरोपीचे व फिर्यादी पुर्वी पासुन भांडण आहे. तंटामुक्ती कडे लेखी अर्ज दिला नव्हता. आम्ही जाण्यापुर्वी आरोपींना सुचना दिली नाही. मी पोलीसांना बयान देते वेळी तंटामुक्ती सदस्य असल्याचे सांगितले नव्हते. मी माझ्या जवाबात त्यावेळी ईश्वर बोहरे तेथे हजर होता, त्यांनी धुऱ्याच्या भांडणाविषयी सांगितले व समझौता करायचा आहे असे सांगितले, तेथे विनोद बोहरे आलेला होता, त्यावेळी त्याला समझौता बाबत सांगितले असता, बापचीला बोलावे लागेल असे त्याने सांगितले, असे माझ्या जवाबात का नमुद नाही त्याचे कारण सांगु शकत नाही. आजुबाजूला भरपूर लोकांच्या जमीनी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो तसी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विनोद ने इश्वर यास पावडयाने मारले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ईश्वर सोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत संबंध खराब असल्याने मी त्यांना

फसविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**स्वा/-**

आमगांव (एम.व्ही.जावळे)

दिनांक : १८/०२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

सरकार / बाळकृष्ण
नि.क्र.४४

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : मंजुकार मोतीराम हत्तीमारे
वय : ४६ वर्षे, कामधंदा : नोकरी
राहणार : शिवणी, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना व फिर्यादीला ओळखतो. मला घटनेची तारीख आठवत नाही. मला घटनेबाबत काही माहित नाही. माझ्या समक्ष असे काही घडले नाही, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो, त्यावेळी विनोद बोहरे उपस्थित होते व त्याने वडील व भाऊ यांना बोलावून आणले व पावडयाने फिर्यादीच्या मुलास डोक्यात मारुन जखमी केली होती.

**साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपास करण्याकरीता परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते.**

**उलटतपास सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बाळकृष्ण बोहरे उपस्थित तेथे होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ग्राम पंचायत सदस्य चंद्रशेखर राखडे व माजी ग्राम पंचायत सदस्य नेतराम बोहरे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही सर्वांनी ईश्वर बोहरे व विनोद बोहरे यांना वादा बाबत विचारले असता, विनोद बोहरे याने शिव धुऱ्यावरील पाण्याचे पाईप उचलून फेकले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे याने वडील बाळकृष्ण बोहरे व भाऊ प्रमोद बोहरे यांना बोलावून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याच्या हाता पावडा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याने उपस्थित लोकांना काही न विचारता ईश्वर बोहरे कॉलर पकडले व प्रमोद बोहरे याने ईश्वर बोहरे याला मागेहून पकडले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे त्याच्या हातातील पावडयाने ईश्वर बोहरे याचे डोकयात मारले, त्यावेळी रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर त्याने ईश्वरच्या पायावर मारले. हे म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. गुप्ता यांनी नाकारले.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
**स्वा/-**
(एम.व्ही.जावळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

आमगांव
दिनांक : १५/०३/२०२५

सरकार / बाळकृष्ण
नि.क्र.४५

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : भाऊराव हरी राकडे
वय : ५३ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : शिवणटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपींना व फिर्यादीला ओळखतो. मला घटनेची तारीख आठवत नाही. मला घटनेबाबत काही माहित नाही. माझ्या समक्ष असे काही घडले नाही, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो, त्यावेळी विनोद बोहरे उपस्थित होते व त्याने वडील व भाऊ यांना बोलावून आणले व पावडयाने फिर्यादीच्या मुलास डोक्यात मारुन जखमी केली होती.

**साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपास करण्याकरीता परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते.**

**उलटतपास सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बाळकृष्ण बोहरे उपस्थित तेथे होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ग्राम पंचायत सदस्य चंद्रशेखर राखडे व माजी ग्राम पंचायत सदस्य नेतराम बोहरे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही सर्वांनी ईश्वर बोहरे व विनोद बोहरे यांना वादा बाबत विचारले असता, विनोद बोहरे याने शिव धुऱ्यावरील पाण्याचे पाईप उचलून फेकले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे याने वडील बाळकृष्ण बोहरे व भाऊ प्रमोद बोहरे यांना बोलावून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याच्या हाता पावडा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याने उपस्थित लोकांना काही न विचारता ईश्वर बोहरे कॉलर पकडले व प्रमोद बोहरे याने ईश्वर बोहरे याला मागेहून पकडले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे त्याच्या हातातील पावडयाने ईश्वर बोहरे याचे डोकयात मारले, त्यावेळी रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर त्याने ईश्वरच्या पायावर मारले. हे म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. गुप्ता यांनी नाकारले.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
**स्वा/-**
(एम.व्ही.जावळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

आमगांव
दिनांक : १५/०३/२०२५

नि. फौ. ख. क्र. ७२/२०२३.
सरकार / बाळकृष्ण
नि. क्र. ४६

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ ची जबानी,**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | सुनिल रमेश बोहरे, |
| वय | : | ३६ वर्षे, कामधंदा : शेती, |
| राहणार | : | शिवणटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया |

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

मी आरोपी व फिर्यादीला ओळखतो. मला घटनेची तारीख आठवत नाही. मला घटनेबाबत काही माहित नाही. माझ्या समक्ष असे काही घडले नाही, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो, त्यावेळी विनोद बोहरे उपस्थित होते व त्याने वडील व भाऊ यांना बोलावून आणले व पावड्याने फिर्यादीच्या मुलास डोक्यात मारुन जखमी केली होती.

**साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपास करण्याकरीता परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते.**

**उलटतपास सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/०१/२०२३ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बाळकृष्ण बोहरे यांचे शिव धुऱ्याचे वाद मिटविण्यासाठी त्यांच्या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बाळकृष्ण बोहरे उपस्थित तेथे होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ग्राम पंचायत सदस्य चंद्रशेखर राखडे व माजी ग्राम पंचायत सदस्य नेतराम बोहरे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही सर्वांनी ईश्वर बोहरे व विनोद बोहरे यांना वादा बाबत विचारले असता, विनोद बोहरे याने शिव धुऱ्यावरील पाण्याचे पाईप उचलून फेकले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे याने वडील बाळकृष्ण बोहरे व भाऊ प्रमोद बोहरे यांना बोलावून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याच्या हातात पावडा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विनोद बोहरे याने उपस्थित लोकांना काही न विचारता ईश्वर बोहरे कॉलर पकडले व प्रमोद बोहरे याने ईश्वर बोहरे याला मागेहून पकडले. हे म्हणणे खरे नाही की, विनोद बोहरे याने त्याच्या हातातील पावड्याने ईश्वर बोहरे याचे डोक्यात मारले, त्यावेळी रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर त्याने ईश्वरच्या पायावर मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी विनोद याच्या हातातील पावडा हिसकावला व भांडण सोडविले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील एच. आर. गुप्ता यांनी नाकारले.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**स्वा/-**

आमगांव — (एम.व्ही.जावळे)

दिनांक : ११/०४/२०२५ — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

नि. फौ. ख. क्र. ७२/२०२३.
नि. क्र. ५१

## सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ ची जबानी.

**(साक्षीदाराचा तोंडी पुरावा हा गुगल मीट द्वारे mep-vbrc-wec या लिंक द्वारे दुपारी १.०८ वाजता सुरु केला व दुपारी १.२५ वाजता संपला.)**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांवः- राजेश पंकज शेंद्रे,
वयः- ५२, हुद्दा - सहा. पोलीस उपनिरीक्षक, ब. क्र. ६५९,
नेमणुक - सायबर सेल गोंदिया.

**सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री आर. डब्लु. बोरकर यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरु-**

१. फिर्यादी व आरोपी यांना मी ओळखतो. गुन्हा क्र. १९/२०२३ चा तपास माझ्याकडे सोपविण्यात आला होता. मी तपासाच्या दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला. तो निशाणी ३३ वर आहे. त्यानंतर जप्ती पंचनामा केला. तो निशाणी ४० वर आहे. त्यानंतर क्युरी रिपोर्ट मागविला. मी त्यानंतर साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. त्यानंतर योग्य पुरावा मिळाल्यानंतर आरोपींचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री एम. एच. गुप्ता यांचेमार्फत सुरु-**

२. मी चंद्रकुमार हिरालाल राखडे याचा जबाब मी नोंदविला होता. त्याने माझ्या समोर जबाब देत असतांना प्रमोद म्हणाला मी मोठ्या भावाला व वडीलांना बोलावून आणतो असे सांगीतले नव्हते. मी ईश्वरदास सुरेश बोहरे याचा जबाब नोंदविला होता. त्याने जबाब नोंदवत असतांना दिनांक २४ तारखेला पाणी वागविण्याकरीता पाईप लावला होता तो आरोपीने फेकुन दिला होता असे सांगीतले नव्हते. मी नेतराम मोतीराम बोहरे याचा जबाब नोंदविला होता. त्याने त्याचे जबाबामध्ये ईश्वर बोहरे तिथे हजर होता त्याने धु-याच्या भांडणाविषयी सांगीतले होते व समझोता करायचा आहे असे सांगीतले, तेथे विनोद बोहरे आलेला होता, त्यावेळी त्याला समझोता बाबत सांगीतले असता बापचीला बोलावे लागले असे सांगीतले, हा मजकुर सांगीतला नव्हता. मी कुसमन सुरेश बोहरे याचा जबाब नोंदविला होता. त्याने तक्रार देतेवेळी माझा मुलगा बेशुध्द पडला होता असे सांगीतले नव्हते.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले

नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष बनविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा पोलीस ठाण्यात बनविला. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्ती पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फावडे जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणाचा योग्य तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा नसतांना मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**.
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**
**स्वा/–**
**(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांकः– ०५/०८/२०२५.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.**